सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डास निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-सकबो-२०१७/प्र.क्र.६०/का-१०

नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख-१६ मार्च, २०१८.

वाचा :-

१. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७.
२. शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक -सकबो-२०१७/प्र.क्र.६०/का-१०, दि.२२ मे, २०१७.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७ व दि.०८ ऑगस्ट, २०१७.
४. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१७/१८/कोषा.प्रशा.-५, दि.२९ जानेवारी, २०१८.
५. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अ्रथ-३, दि.०१ फेब्रुवारी, २०१८ व दि.०६ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात २२३५ बी ९४२ या लेखाशिर्षाखाली वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ येथील परिपत्रकानुसार सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी २२३५ बी ९४२ या लेखाशिर्षाखाली ३६ सहायक अनुदाने (वेतन) या बाबीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद ₹४२,२४,०००/- (अक्षरी रुपये बेचाळीस लाख चोवीस हजार फक्त) च्या ८०% मर्यादेत ₹३३,७९,२००/- (अक्षरी रुपये तेहतीस लाख एकोणऐंशी हजार दोनशे फक्त) व ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद ₹५,५०,५३,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी पन्नास लाख त्रेपन्न हजार फक्त) च्या ८०% मर्यादेत ₹४,४०,४२,४००/- (अक्षरी रुपये चार कोटी चाळीस लाख बेचाळीस हजार चारशे फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य समाजकल्याण संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.५ येथील परिपत्रकानुसार सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी २२३५ बी ९४२ या लेखाशिर्षाखाली ३६ सहायक अनुदाने (वेतन) या बाबीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद ₹४२,२४,०००/- (अक्षरी रुपये बेचाळीस लाख चोवीस हजार फक्त) पैकी उपलब्ध २०% अवितरित तरतूद ₹८,४४,८००/- (अक्षरी रुपये आठ लाख चव्वेचाळीस हजार आठशे फक्त) व ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीसाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद ₹५,५०,५३,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी पन्नास लाख त्रेपन्न हजार फक्त) पैकी उपलब्ध १०% अवितरित तरतूद

₹५५,०५,३००/- (अक्षरी रुपये पंचावन्न लाख पाच हजार तिनशे फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डास वितरीत करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात २२३५ बी ९४२ या लेखाशिर्षाखाली ३६ सहायक अनुदाने (वेतन) या बाबीसाठी उपलब्ध अवितरित तरतूद **₹८,४४,८००/- (अक्षरी रुपये आठ लाख चव्वेचाळीस हजार आठशे फक्त)** व ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीसाठी उपलब्ध अवितरित तरतूद **₹५५,०५,३००/- (अक्षरी रुपये पंचावन्न लाख पाच हजार तिनशे फक्त)** इतका निधी महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डास वितरित करण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डास वितरित करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. आहरण व संवितरण अधिकारी यांनी हा निधी महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डास वितरीत करावा. तथापि, सदरचा निधी कोषागारातून एकदम आहरित न करता महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डाची खर्चाची / निधीची आवश्यकता तपासून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर (आहरण व संवितरण अधिकारी) यांनी खर्चाचे देयक कोषागारात सादर करावे. जेणेकरुन विनाकरण निधी समाजकल्याण बोर्डाकडे शिल्लक राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची दक्षता सचिव, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड व आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी घ्यावी.

४. सदर रक्कम मागणी क्र.एक्स-१, योजनेत्तर, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण १०२, बाल कल्याण (०२) (०४) महाराष्ट्र राज्य समाजकल्याण मंडळाला सहायक अनुदान (२२३५ बी ९४२) ३६ सहायक अनुदाने (वेतने), व ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतूदीतून खर्च करण्यात यावी.

५. वित्त विभागाच्या क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद तपासणी सूची व परिच्छेद क्र.७ ते १८ मधील विभागास लागू होणाऱ्या बाबींची पूर्तता होत असल्याने विभागाच्या स्तरावर सदर निधी वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय, वित्त विभाग परिपत्रक दि.१८ एप्रिल, २०१७, दि.३० जून, २०१७, दि.०८ ऑगस्ट, २०१७, दि.२९ जानेवारी, २०१८, दि.०१ फेब्रुवारी, २०१८ व दि.०६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३२०१७०४५८५८३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2018.03.20 17:07:37 +05'30'

(स्मिता निवतकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सचिव, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड, चेंबूर, मुंबई-७१
३. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
४. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
७. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर
८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर निधी बी.डी.एस. प्रणालीवर वितरीत करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
११. निवड नस्ती, का-१०.